# विविध ऑपरेटींग सिस्टीम्समध्ये
# युनिकोडप्रणित मराठी कार्यरत करण्याची कृती

**प्रत्येक कार्यकारी प्रणालीचा संगणक घेऊन पुढील कृतींचे छायाचित्रण करावे लागेल..**

## (ऑपरेटिंग सिस्टिम )कार्यकारी प्रणाली – विंडोज ७

- Start >Settings > Control panel >Regional and Language options या पर्यायावर जा.
- Region and Language options मध्ये Keyboards and Language मधील Change Keyboard ह्या खुणेवर क्लिक करा.
- Text services and Input Languages नावाच्या चौकटीतल्या Add ह्या खुणेवर क्लिक करा.
- Add Input Language खूण असलेली लहान चौकट उघडेल. त्यातील Input Language मधील भाषांच्या सूचीतून Marathi निवडा, OK या खुणेवर क्लिक करा.
- आता Text services and Input Language च्या तळाशी असलेल्या Apply आणि OK या बटणांवर क्रमाने क्लिक करा.
- संगणकाच्या उजव्या बाजूला कोपऱ्यात EN अशी खूण येईल.
- EN ह्या खुणेवर क्लिक केल्यावर English असे लिहिलेले दिसेल. त्याखालीच MA Marathi असेही लिहिलेले दिसेल.
- MA ही खूण म्हणजेच मराठी वापरण्याचा पर्याय. तो क्लिक करुन निवडल्यावर मराठीतून काम करता येते. तो बदलून इंग्रजी वापरायचे असेल, तर पुन्हा EN चा पर्याय निवडा.
- लक्षात ठेवा Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.

## कार्यकारी प्रणाली – विंडोज ८, १०

- Start > Control panel >All control>Panel Item> Language
- Add a Language खूण असलेली लहान चौकटीवर क्लिक करा. त्यातील भाषांच्या सूचीतून Marathi वर जाऊन Add या खुणेवर क्लिक करा.
- यानंतर कळफलक मराठी होईल. Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.
- इन्स्क्रिप्टव्यतिरिक्त इतर कळफलक वापरण्यासाठीची कृती सोबत दिली आहे.

# कार्यकारी प्रणाली – विंडोज एक्सपी

- **विशेष टीप- विंडोज् XP मध्ये युनिकोड क्रियाशील करण्यासाठी XP ची Installation CD लागते.**
- XP Professional साठी -Start > Control panel>Region and Language options
- XP Home Edition साठी- Start> Control panel> Date, Time, Language and Regional Option > Region and Language options
- नंतर Languages यावर क्लिक करा
- Regional Options या चौकटीत Standards and formats ही चौकट बरचेदा छोट्या चौकटीत English (United States) असे लिहलेले दिसते.
- चौकटीतील Supplemental language support या भागातील Install files for complex scripts and right-to-left languages (including Thai) हा पर्याय निवडा. Apply आणि OK वर टिक करा. यानंतर Install Supplemental Language Support या वर OK करा
- Files needed असे शब्द असलेली चौकट दिसेल. संगणकाकडून विंडोज् XP च्या i386 या फोल्डरसाठी Installation CD ची मागणी होईल. ती सीडी टाका
- Regional and Language Options...Copying Files अशी प्रक्रिया सुरु होईल.
- यानंतर संगणक पुनर्स्थित / रिस्टार्ट करावा.
- Start > Control panel > Regional and Language options चौकट उघडले . त्यातील व Languages या खुणेवर टिक करा.
- दुसरी चौकट उघडले . त्यात Details या खुणेवर टिक करा.
- Text services and input languages नावाची नवी चौकट उघडेल.
- या चौकटीत Add या खुणेवर टिक करा.
- Add Input Language खूण असलेली लहान चौकट उघडेल.
- यातील Input language खालील भाषांच्या यादीतून Marathi निवडा.
- OK या खुणेवर टिक करा.
- संगणकाच्या उजव्या बाजूला कोपर्‍यात EN अशी खूण येईल.
- EN ह्या खुणेवर क्लिक केल्यावर English असे लिहिलेले दिसेल. त्याखालीच MA Marathi असेही लिहिलेले दिसेल. MA ही खूण म्हणजेच मराठी वापरण्याचा पर्याय. तो क्लिक करुन निवडल्यावर मराठीतून काम करता येते. तो बदलून इंग्रजी वापरायचे असेल, तर पुन्हा EN चा पर्याय निवडा.

- Alt व Shift ह्या कीज् एकाच वेळी दाबून MA व EN चे पर्याय बदलतात. कृती पूर्ण झाल्यावर इन्स्क्रिप्ट कळफलक आपोआप (बाय डिफॉल्ट) लागू होतो.

**कळफलकांचे विविध पर्याय –**

- संगणकावर कोणत्याही ऑपरेटिंग सिस्टिममध्ये युनिकोडप्रणित मराठी टाईप करण्यासाठी कळफलकाचे विविध पर्याय उपलब्ध आहेत.
- इनस्क्रिप्ट (भारतलिपी) हा भारतीय मानक ब्युरोने प्रमाणित केलेला कळफलक आहे. भाषातज्ज्ञ आणि संगणकतज्ज्ञ इनस्क्रिप्ट (भारतलिपी) वापरावा, असा आग्रह धरतात. शास्त्रीयदृष्ट्या योग्य असलेला हा कळफलक आपण सर्वांनी वापरणे अपेक्षित आहे.
- मराठी टंकलेखनासाठी इनस्क्रिप्टशिवाय कळफलकांचे विविध पर्याय उपलब्ध आहेत. गुगल इनपुट या साधनाच्या माध्यमातून, तुम्ही फोनेटिक पद्धतीचा कळफलक वापरु शकता.
- तसेच http://raigad.nic.in/ व http://www.bhashaindia.com अशा संकेतस्थळांवरही कळफलकांचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.

## (या खालील मजकूर हा माहितीपटाचा भाग नसेल)

## इन्स्क्रिप्ट व इतर कळफलक उतरवण्यासाठी –

- http://www.bhashaindia.com या संकेतस्थळावरील Marathi_IME_setup.zip ही कळफलकांचे विविध पर्याय देणारी धारिका आपल्या संगणकावर उतरवून घ्या. ती संगणकावर संग्रहित (Save) करा.
- त्यातील Setup.exe ही धारिका दोनदा क्लिक करून कार्यरत करून घ्या.
- Marathi IME- कळफलक कार्यरत करण्यासाठी पुढील एकेका खुणेवर बाण नेऊन क्रमाने क्लिक करा – Start > Settings> Control panel > Regional and Language options > Details > Add
- Add Input Language अशी खूण असलेली एक चौकट उघडेल. त्यात Keyboard layout/ IME ह्या चौकटीत क्लिक करा.
- त्यातील सूचीतून Marathi Indic IME 1 [V 5.0] हा पर्याय निवडा व OK म्हणा. आता IME 1 [V 6.0] ही उपलब्ध झाला आहे.
- Text Services and input languages - ह्या आधीच्या चौकटीतील Installed services या लहान चौकटीत पाहा. MA Marathi खाली Keyboard मध्ये Marathi Indic IME 1 [V 5.0] हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करून Apply व OK म्हणा.
- तळपट्टीच्या उजवीकडे पाच चौकोनांची पट्टी दिसेल. त्यातील दुसऱ्या चौकोनात क्लिक केल्यावर अनेक कळफलकांची नावे दिसतील.
- इन्स्क्रिप्ट हा कळफलकच वापरावा, असे संगणक व भाषा क्षेत्रातील तज्ज्ञ सुचवितात. कळफलकांचे अन्य पर्यायही या कृतीमुळे उपलब्ध होतात.